# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०२/२०२५ (शनिवार) दुपार**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतां विरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन भिवापुर** :—दिनांक १४/०२/२०२५ रोजी भिवापुर पोलीस पोस्टे हददीत पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी कऱ्हाडला रिसोर्ट फाटा भिवापुर येथे नाकाबंदी केली . **ट्रक क्र.एम एच ४९ बी.झेड ०४२०** थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यात रेती भरून दिसली.चालकास त्याचे नाव, पत्ता विचारले असता त्याने **मोहम्मद मुजाहीद मोबिन अन्सारी, वय ३३ वर्षे, रा. शक्तीमाता नगर खरबी रोड, नागपुर** असे सांगितले. चालकाला परवान्याबाबत विचारपुस केली त्याच्या जवळ कोणताही परवाना नसल्याने सांगितले .त्याला वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता वाहन मालक आरोपी **अब्दुल जहीर अब्दुल बशीर, रा.खरबी रोड साईबाबा नगर ,नागपुर** यांच्या सांगण्यावरून रेतीची अवैध वाहतुक करीत असल्याबाबत सांगितले. पंचासमक्ष **चालक आरोपीच्या ताब्यातुन ट्रक क्र.एम एच ४९ बी.झेड ०४२० किमती २०,००,०००/— रूपये व त्यामध्ये ८ ब्रास रेती, किमती २५,००० /—रूपये असा एकुण २०,२५,००० /— रूपयाचा चा मुददेमाल जप्त करण्यत आला.**

**चालक मोहम्मद मुजाहीद मोबिन अन्सारी, वय ३३ वर्षे, रा. शक्तीमाता नगर खरबी रोड ,नागपुर** व वाहन मालक **अब्दुल जहीर अब्दुल बशीर, रा.खरबी रोड साईबाबा नगर ,नागपुर**,जि. नागपुर यांच्या विरूध्द कलम ३०३(२),४९,३(५), भा.न्या.स सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, सहकलम ४,२१ खन आणि खनिज अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधि. अन्वये **गुन्हा नोंद करण्यात आले आहे.**

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर